प्रकाशन नंबर ५

# डेक्कन ॲग्रिकल्चरल असोसिएशन, पुणें

प्रकाशन ५ वें

प्राचार्य धनंजयराव गाडगीळ यांची

दोन व्याख्यानें

१. गरीब व अप्रगत देशांचा आर्थिक विकास.

२. भारताची पंचवार्षिक योजना.

X.1(Y:42)
J1
035125

P-8

१. गरीब व अप्रगत देशांचा आर्थिक विकास
२. भारताची पंचवार्षिक योजना.

X.1(Y:42)
J1
35125

# गरीब व अप्रगत देशांचा आर्थिक विकास
## व
# भारताची पंचवार्षिक योजना

### प्राचार्य धनंजयराव गाडगीळ यांची दोन व्याख्यानें

डेक्कन ॲग्रिकल्चरल ॲसोसिअेशनच्या विद्यमानें पुणें येथील गोखले स्मारक मंदिरामध्यें भारतांतील सुप्रसिद्ध व विद्वान अर्थशास्त्रज्ञ व यूनोच्या अप्रगत देशांच्या आर्थिक विकासयोजना समितीचे सभासद **प्राचार्य धनंजयराव गाडगीळ** एम्. ए. एम्. लिट् (कँटब) यांची (१) **'गरीब व अप्रगत देशांचा आर्थिक विकास'** व (२) **भारताची पंचवार्षिक योजना** या विषयांवर अनुक्रमे बुधवार दि. १२ व गुरुवार दि. १३ सप्टेंबर १९५१ रोजीं सायंकाळीं दोन व्याख्यानें झाली. या दोहीं व्याख्यानास पुण्यांतील सर्व राजकीय व सामाजिक पक्षांचें प्रमुख स्त्रीपुरुष कार्यकर्ते आणि विद्वान स्त्रीपुरुष नागरिक व विद्यार्थी बहुसंख्येनें उपस्थित होते. पहिल्या दिवशीं

## गरीब व अप्रगत देशांचा आर्थिक विकास

या विषयावर बोलतांना प्रा. धनंजयराव गाडगीळ म्हणाले कीं, 'गरीब व अप्रगत देशांचा आर्थिक विकास' आणि 'भारताची पंचवार्षिक योजना' असें माझ्या व्याख्यानांचे दोन निराळे विषय देण्यांत आले असले तरी त्यांचे विवेचन मी अेकत्रच करणार आहे. आपला हा देश गरीब व अप्रगत आहे. त्याचा आर्थिक विकास आपलें सरकार व अेकंदर जनता या सर्वांच्याच प्रयत्नानें घडून येणार आहे. त्या प्रयत्नांत आपण सर्वांनींच हातभार लावण्यास सिद्ध असलें पाहिजे. माझ्यासारखा मनुष्य हा हातभार या विषयासंबंधीं आपले विचार मांडून व विवेचन करून लावूं शकतो. हें मी या दोन व्याख्यानांच्याद्वारा आतां करणार आहे. ज्या विषयामध्यें सार्वत्रिक हित सामावले आहे, त्यासंबंधीच्या योजना शास्त्रशुद्ध झाल्या पाहिजेत. या प्रश्नाकडें पाहण्याची माझी दृष्टी केवळ त्या योजना शास्त्रशुद्ध कशा राहतील हे पाहण्याची असल्यामुळें हें विवेचन करीत असता मला किंचित निष्टुर व कटु बोलावे लागण्याचा संभव आहे. यांत व्यक्ती किंवा पक्ष यांचा कांहीं अेक संबंध नाहीं. अेकंदर जनतेच्या जिव्हाळयाचा हा प्रश्न असल्यामुळें त्यांचा विचार अगदी सडेतोडपणें झाला पाहिजे असें मला वाटते. त्यामुळें मला थोडेसें अप्रिय कार्य करावें लागणार आहे.

जगांतील एकंदर गरीब व अप्रगत देशांच्या आर्थिक विकासाचा विचार करूं लागल्यास,

जगांत गरीब व अप्रगत देशांचीच संख्या अधिक आहे असें दिसून येईल. यांच्या आर्थिक संबंधींच्या सर्वसाधारण विचाराबाबत तज्ञांत फारसें मतभेद होतील असें वाटत नाहीं. हेच सर्वसामान्य विचार हिंदुस्थानच्या पंचवार्षिक योजनेच्या विशेष अनुरोधानें मी सांगणार आहे.

गरीब व अप्रगत आणि संपन्न व प्रगत या व्याख्या तुलनात्मक दृष्टीनेंच केव्हांही होऊं शकतील आणि हीं तुलनात्मक गमकें व क्रम हीही बदलत असतात. प्रत्येक देशाची तुलनात्मक परिस्थिति नेहमीं तीच अेकसारखी राहते असें नाहीं. आपण भारतीय दोनशें वर्षांपूर्वी आर्थिक दृष्ट्या अितरांच्या मानानें अितके मागासलेले नव्हतो आणि आज आपण तुलनेनें जितके गरीब आहोंत अितके ५०-६० वर्षांपूर्वी नव्हतो. अमेरिकेचे आजचे दरडोई वार्षिक उत्पन्न ८००० रुपये आहे तर भारतामध्यें हे प्रमाण अवघें २५० रुपये आहे. म्हणजे आज आपल्यापेक्षां अमेरिकेचें उत्पन्न तीस-बत्तीस पटींनीं अधिक आहे. ५०-६० वर्षांपूर्वी आपण आणि अमेरिका यांच्यामध्यें हें अंतर अितकें नव्हते. हा अितका फरक आज कां पडतो याचा विचार झाला पाहिजे.

आर्थिक प्रगति व विकास म्हणजे तरी काय ? हें अगदीं प्रारंभापासून पाहूं गेल्यास असें दिसेल कीं अगदीं प्राथमिक अवस्थेंत

## मानव व अितर प्राणी यांचें जीवन

अेकाच प्रकारचें होते. अितर प्राण्यांसारखाच मानवाचा जीवनक्रम नैसर्गिक परिस्थितीनें पूर्णपणें मर्यादित होता. पुढें माणसे आपला जीवनक्रम सुकर करण्यासाठीं कांहीं बाह्य साधनें वापरूं लागली. अवजारे व हत्यारे यांचा वापर सुरूं होतांच मानव आणि अितर प्राणी यांच्या जीवनक्रमांत फरक पडूं लागला असें दिसून येते. अवजारें व हत्यारे यांच्या उपयोगामुळें मानवाची उत्पादनशक्ति वाढली व त्याच्या उत्पादनांत विविधता येऊं लागली; आणि उपभोग्य वस्तूंच्या वाढत्या निर्मितीबरोबर मनुष्यसमाजाचा आर्थिक विकास होऊं लागला.

तरीपण गेल्या दोनशें वर्षांपूर्वी पर्यंतच्या काळांत या उत्पादन–साधनांच्या विकासाची गति बरीच मंद होती. फार प्राचीनकाळीं सुधारलेल्या अशा अिजिप्त देशांत ज्या प्रकारची साधनसामुग्री मानवांनीं तयार केली होती त्यामध्यें आणि इसवी सन सतराव्या किंवा अठराव्या शतकांतील बहुतेक देशांत साधनसामुग्रीमध्यें फारसें अंतर नव्हते. त्या एका प्रदीर्घ कालखंडाच्या मानानें गेल्या दोन अडीच शतकांत झालेली साधनसामुग्रीची वाढ फारच झपाट्यानें व विविधप्रकारें झालेली आहे असें दिसून येते. ही उत्पादन–साधनांची प्रगति व आर्थिक विकास यांचा फार निकट संबंध आहे.

माणूस पूर्वीं फक्त स्वतःची व अितर प्राण्यांचीच शक्ति उत्पादनकार्यासाठीं वापरीत असे. परंतु गेल्या दोन शतकांत वाफ, वीज, खनिज तेल इत्यादींच्या उपयोगामुळें ही शक्ति अनेक

पटीनें वाढली आहे. तसेंच केवळ अवजारें अथवा हत्यारें यांऐवजीं उत्पादनांत यंत्रांचा उपयोग करण्याचें ज्ञान होऊन यंत्रशास्त्र झपाट्यानें वाढलें. या सर्वांमुळें विशेषत: औद्योगिक विकास झाला. आणि मानवाची अेकंदर उत्पादनशक्तीच वाढली. परंतु जगांतील प्रत्येक देशांत हा विकासच सारखा झालेला नसल्यामुळें जेथें तो जास्त प्रमाणांत झाला ते देश संपन्न व प्रगत झाले आणि जेथें तो अल्प प्रमाणांत झाला किंवा झालाच नाहीं ते गरीब व अप्रगत राहिले. संपन्न व प्रगत आणि गरीब व अप्रगत हा फरक मुख्यत्वें या यांत्रिक युगामुळें झाला. देशादेशांतील हा फरक कमी करून अितर संपन्न व प्रगत देशांच्याबरोबर आपणास जाणें असल्यास नवविज्ञानाच्या व यंत्रांच्या सहाय्यानें आपणास आपलें उत्पादन—सामर्थ्य वाढविले पाहिजे हें उघड आहे. परंतु यांत्रिक साधनें फार अवजड, बहुविध व खर्चिक स्वरूपाची आहेत; व त्यांचा वापर व नवविज्ञानाचा प्रसार याकरितां अनुरूप अशी समाजरचना, अर्थव्यवस्था व शासनसंस्था बनवावी लागतील. थोडक्यांत आपली आर्थिक व सामाजिक घडीच नव्यानें बसवावी लागेल.

साधनांची प्रगति म्हणजे काय हें पाहूं गेल्यास उत्पादनसाधनांच्या वाढीच्या क्रियेचें स्वरूप अगदीं साध्या उदाहरणानेंही स्पष्ट होण्यासारखें आहे. प्राथमिक अवस्थेंत मनुष्य आपलें भक्ष्य केवळ आपल्या अवयवांचाच उपयोग करून मिळवीत असे. पुढें त्यानें धनुष्य-बाण अगर जाळें वापरावयास सुरुवात केली तेव्हां त्यास या साधनांच्या उपयोगांचा शोध व ज्ञान होणें याबरोबरच हीं साधनें निर्माण करण्याकरितां वेळ व शक्ति खर्च करणें हेंही आलें. प्रत्यक्ष भक्ष्य मिळविण्यांत सर्व वेळ व शक्ति न घालविता त्यांतील काहीं साधनांच्या उत्पादनांत घालविणें शक्य असल्यास तें फायदेशीर ठरूं लागले तेव्हां उत्पादन साधनांच्या वाढीस त्यांच्या ज्ञानाप्रमाणेंच त्यांच्या निर्मितीकरितां मोकळा वेळ व शक्ति असणें आवश्यक असतें.

गरीब व अप्रगत देशांना नवीन साधनांची निर्मिती करण्यांत अनेक अडचणी येतात. मुख्य अडचण म्हणजे गरीबीचीच. समाजाच्या नित्याच्या गरजा भागवून वेळ उरला तरच साधनांची निर्मिती होणार व ही निर्मिती ज्या प्रमाणांत वाढणार त्या प्रमाणांतच नवीन साधनांचा संचय होणार. तसेंच साधनांच्या निर्मितीकरितां लागणाऱ्या कष्टांच्या मानानें साधनांची उत्पादन—क्षमता जेवढी अधिक असेल तेवढी त्यांची निर्मिती जास्त फायदेशीर ठरावयाची. साधन—उत्पादनाकरितां वेळ व शक्ति खर्च करण्याची जितकी शक्यता अधिक तितकी समाजाची साधनसंपत्तीची वाढ अधिक होण्याचा संभव जास्त व जेवढ्या प्रमाणांत साधनें उत्पादनक्षम तेवढ्या प्रमाणांत उत्पादनाची वाढ झपाट्यानें होत जाणार! यांत्रिक युगानें मुख्य फरक साधनांच्या उत्पादनक्षमतेंत घडवून आणला आहे. नुसते उत्पादनाचें केंद्रीकरण करून अगर प्रमाण वाढवून हा फरक घडून आलेला नाहीं. हातमाग कारखानें एकत्र करण्यांत विशेष मुद्दा नाहीं. यांत्रिक मागांच्या तेवढ्याच संख्येमुळें

उत्पादन कितीतरी जास्त पटीनें वाढतें.

यंत्रामुळें नवयुग आले. या नव्या युगांत साधनसंपत्तीचें महत्व वाढलें व त्याबरोबर एकंदर उत्पादन अनेकश: वाढलें व मोठ्या प्रमाणावर संचयहि होऊं लागला. जुन्या काळांत संपत्तीचा संचय मर्यादित असे, याचें कारण उत्पादन मर्यादित एवढेंच नव्हे तर संचय झाल्यास नव साधनांची कार्यक्षमताही मर्यादित म्हणून जुन्या श्रीमंतीची कल्पना म्हणजे दासदासी व कलाकुसरीच्या वस्तूंचा संचय अशा प्रकारच्या होत्या. आतां उपभोग्य वस्तू पुष्कळ व त्यांचें उत्पादनहि पुष्कळ व हें सर्व विविध साधन-साहित्यामुळें शक्य. त्यामुळें या यंत्रयुगाबरोबरच साधन-संचयाचें म्हणजे भांडवलशाहीचें युग आलें.

उत्पादनक्षम साधनांचा संचय करून अेकंदर समाजाची साधनसंपत्ती वाढविणें हा तो समाज अथवा तो देश संपन्न करण्याचा अेकच मार्ग आहे. गरीब राष्ट्रांचा साधनसंचय कमी. श्रीमंत राष्ट्रांचा हा साधनसंचय मोठा म्हणून तेथील प्रत्येक माणसाची उत्पादनक्षमताहि गरीब देशांतील माणसापेक्षां अधिक असते. याचा अर्थ सधन देशांतील मनुष्य गरीब देशांतील माणसापेक्षां अधिक कसबी, अधिक वाकबगार असतो असे नाहीं. त्याच्या सहाय्यास अधिक साधनसामुग्री म्हणून तो अधिक उत्पादनक्षम वाटतो अेवढेच. आपणास हे सर्व साध्य करून घ्यावयाचे असल्यास ही साधनसामग्री व ती वापरण्याचें ज्ञान हीं उपलब्ध करून घेतली पाहिजेत.

अर्थात् यंत्रें उपलब्ध झाल्यानें हें सर्व साध्य होईल असें नव्हे. याबरोबरच इतर नवे मार्गहि चोखाळावे लागतात. म्हणजे नवीन पद्धतीच्या अर्थसंस्था, पेढ्या, वाहतूक व क्रय-विक्रय व्यवस्था इत्यादि यंत्रयुगाच्या अनुषंगानें येणाऱ्या सर्व नव्या गोष्टी साध्य करून घ्याव्या लागतील. हे सर्व जेव्हां आपणास उपलब्ध होअील तेव्हां आपण संपन्न व प्रगत होऊं.

आपली साधनसंपत्ति वाढविण्याचे दोन मार्ग आहेत; ती विकत आणणें किंवा स्वदेशीं तयार करणें. विकत आणावयाची तर त्यास पैसा हवा व हा पैसा हातीं येणें दोन प्रकारें संभवतें. अेक म्हणजे धनसंचय करणें व दुसरा संपन्न देशांकडून कर्ज घेणें. यापैकीं कोणती तरी अेक गोष्ट मान्य झाल्याविना आपणास अिष्ट दिशेनें पाऊल टाकतां येणार नाहीं.

धनसंचय होण्यास आजच्या राष्ट्रीय प्राप्तींत वाढ झाली पाहिजे. तसेंच उपभोग्य वस्तूंचा वापर कमी करून एकंदर प्राप्तींतील तात्कालिक गरजांकरितां व्यय कमी झाला पाहिजे. देशांत साधनसामग्री करण्याकरितांही हेंच साधावें लागेल. कारण येथें साधनसामग्री तयार करावयाची तर नवीन उद्योगधंदे काढावे लागतील व त्याकरितां भांडवली विनियोग व मनुष्यबळ योजावें लागेल. हेंही तात्कालिक व्यय कमी करून एकंदर बचत करूनच होऊं शकेल.

**बचत केली पाहिजे हें म्हणणें ठीक आहे.**

परंतु आपल्या या गरीब देशांत बचत करा सांगणें हेंही कठीण आणि प्रत्यक्षांत आणणें त्याहून कठीण आहे. राष्ट्रीय बचत करणें म्हणजे अन्न व वस्त्र इत्यादींकारितां जो कांहीं व्यय होतो, त्यांत कमी करण्याखेरीज गत्यंतर नाहीं. परंतु आधीच येथील खाली गेलेले राहणीचें मान लक्षांत घेतां बचत करा हें सांगणें सोपे नाहीं असें दिसून येईल. भारतासारख्या

**कृषिप्रधान देशाची दुसरी एक अडचण**

म्हणजे येथील कृषियोग्य एकूण एक भूमी पूर्ण व्याप्त आहे. भारताच्या शेतीबाबत जुन्या ज्ञानाच्या आधारें होणें शक्य होते ते बहुतेक मानवी प्रयत्न झालेले आहेत. गेल्या शेंदीडशें वर्षांतील

**शास्त्रीय प्रगतीचा एकांगी परिणामच**

भारतांत दिसून येऊं शकला किंवा दिसला आणि यामुळें निर्माण झालेल्या अडचणी भारतीयांना भोगाव्या लागत आहेत. औषधीसाधनें व आरोग्याचे नियम यामुळें लोकसंख्येची वाढ पूर्वापेक्षां अधिक झपाट्यानें होत गेली. पाश्चात्य देशांत लोकसंख्येच्या वाढीबरोबरच विज्ञानामुळें उपलब्ध झालेल्या: उत्पादन–साधनामुळें तेथील दरडोई उत्पन्नहि वाढत गेले. परंतु भारतासारख्या देशांत आंग्ल साम्राज्यशाहीच्या आर्थिक दडपणामुळें दरडोई उत्पन्नांत वाढ बिलकुल झाली नाहीं.

आपल्या राष्ट्रांत नवीन विज्ञान व नवे उद्योग न आल्याकारणानें एकाच शेतीच्या व्यवसायावर भर दिला गेला. देशांतील बहुसंख्य लोक कृषिसारख्या प्राथमिक उत्पादनांत गुंतून राहिले व इतर व्यवसायांचे अभावीं लोकसंख्येच्या वाढीबरोबर शेतींतच काम करणारांची अधिकाधिक गर्दी वाढली आणि दर कामकऱ्यामागें शेतजमीनीचें प्रमाण कमी पडूं लागलें शेतकऱ्यास उत्पादनासाठीं जमीनच कमी असल्यामुळें तो कार्यक्षम असूनहि उत्पादन वाढ थोडेंबहुत नवीन ज्ञान वापरूनही फारशी होवूं शकली नाहीं.

गरीब लोकांच्या गरीबीमुळें एकंदर धनसंचयाला वाव कमी; त्यांतल्या त्यांत जेथें भूक्षेत्र मर्यादित व कृषि उत्पादनांत गर्दी जास्त तेथें कृषिक उत्पादनक्षमता कमी व तीव्रतेनें वाढविणेंही कठीण. या सर्व अडचणी लक्षांत घेऊन विकास करणें किती अवघड आहे हें पाहूनच आपण कार्याला आरंभ केला पाहिजे.

एकेकाळीं या भारतभूमींत सोन्याचा धूर निघत होता असें सांगण्यांत येते. पूर्वी आपण संपन्न व प्रगत असूं पण त्या ऐतिहासिक स्मृतीचा आज कांहीं एक उपयोग नाहीं.

आजच्या यंत्रयुगांत आपण व प्रगत देश यामध्यें पडलेलें अंतर भरून काढण्यास व पुढेंही आपली संपन्नस्थिति टिकविण्यास आपल्याला प्राप्त परिस्थितींतील नवीं साधनें वापरून मार्ग काढला पाहिजे. त्यासाठीं आपणास

## कष्ट, त्याग व शिस्तीचें वर्तन

पत्करून परिस्थितीशीं झगडा चावा लागेल, आपल्या संकल्पित विकासाच्या मार्गाची ही पहिली पायरी आहे असें मला वाटते. याबाबत कोणाचा मतभेद होओीळ असें वाटत नाहीं. हें अेकदां लक्षांत आल्यावर आतां त्या दृष्टीनें कशी हालचाल करावयाची हें पाहिले पाहिजे. नवी कला, नवे व्यावसाईक विज्ञान शिकले पाहिजे. तें सोपें नाहीं हें खरें तरी पण तें कष्टसाध्य आहे व प्रयत्नपूर्वक तें साध्य करून घेतले पाहिजे. कलाकुसर किंवा विज्ञान यांत प्रगति करण्यांत भारतीय मार्गे नाहीत.

उत्पादनक्षमता वाढविण्यास आरोग्य संरक्षणाचीही अत्यंत जरूरी असते. धडधाकट माणसेच खूप कष्ट करून देशाच्या आर्थिक उत्पादनांत परिणामकारक भर घालूं शकतात. त्यासाठीं बहुसंख्यांचे राहणीचें किमान मान सुधारले पाहिजे. पण विज्ञान किंवा आरोग्य यांच्या प्रचारा-साठीही खर्च केला पाहिजे, त्याकरितां पैसा हवा. यासाठीं

## धनसंचय हा केंद्रीय विचार

ठरतो. हा धनसंचय करण्याकरितां बहुसंख्य लोकांच्या राहणीचें मान कमीं करण कठाण आहे. याबाबत थोडी कूसची प्राप्तीची आज विषम वांटणी कमी करून काढतां येण्यासारखी आहे. कांहीं थोडे समाज किंवा व्यक्ति अितरांच्या मानानें बरेच श्रीमंत आहेत. त्यांच्या राहणीचें मान थोडे कमी करून बचत करणें शक्य आहे.

गेल्या महायुद्धाच्या काळांत अिंग्लंडनें याच मार्गानें बचत करून युद्धसामुग्रीसाठीं पैसा उभा केला होता आणि आजहि कांहीं अंशीं अिंग्लंडनें हा उपाय चालू ठेवला आहे. श्रीमंतांच्या राहाणीचें मान कमी करण्याचें दोन मार्ग आहेत. (१) त्यांच्यावर बरेच कर लादणें व (२) त्यांना उपलब्ध असणाऱ्या उपभोग्य वस्तु कमी अगर मर्यादित प्रमाणांत उपलब्ध होऊं देणें. अिंग्लंडमध्यें प्रतिवर्षी अनेक नव्या मोटारी तयार होतात. परंतु देशाचे आर्थिक उत्पादन वाढावे म्हणून त्या सर्व परदेशी निर्यात होतात व तेथील श्रीमंत लोकांनाहि नवीन मोटारगाडी मिळणें आज कठीण झाले आहे. राष्ट्रीय बचतीचा हा एक परिणामकारक उपाय आज अिंग्लंडमध्यें अंमलांत आणला जात आहे.

उपभोग्य वस्तूंचें नियंत्रित वांटप करून धनसंचय वाढवितां येतो व अशाप्रकारें वांचविलेल्या संपत्तीचा योग्य विनियोग करून एकंदर राष्ट्रीय उत्पादनामध्यें भर घालतां येते. हा विचार या एकंदर प्रश्नाचा गाभा आहे व या मार्गाच्या शक्याशक्यतेवरच देशाचे आर्थिक विकसन अवलंबून आहे.

देशाच्या एकंदर आर्थिक प्रगतीकडे सर्वांगीण दृष्टीनें पाहिले पाहिजे. प्रत्येक बाबतींत उत्पाद

कसें वाढेल याचा विचार झाला पाहिजे. कृषि–उत्पादन वाढण्यासाठीं--सुधारलेलें बीं–बियाण खतें, कालव्यांचे पाणी, सुधारलेल्या अवजारांचा वापर वगैरे गोष्टी विचारांत घेतल्या पाहिजेत. त्याचप्रमाणें उद्योग, वाहतुक व्यापार यांचेंहि विकास--योजनेंत फार मोठें स्थान आहे. औद्योगिक विकासाशिवाय तर भारतासारख्या कृषिप्रधान देशाची धडगत नाहीं हें स्पष्ट आहे.

देशाचा कृषिव्यवसाय सुधारण्यासाठीं व तो अधिक संपन्न करण्यासाठीं शेतकऱ्यांची म्हणजे कृषिव्यवसायांत राबणाऱ्यांची संख्या कमी केली पाहिजे. प्रत्येक कृषिकाला पुरेसा वाव मिळण्यासाठीं त्यास जास्त जमीन उपलब्ध करून दिली पाहिजे व त्याकरितां प्रथम कृषींतील कांहीं लोकांना नागर-व्यवसायांत गुंतविले पाहिजे. त्यासाठीं कारखाने काढले पाहिजेत. निरनिराळ्या उद्योगधंद्यांचा विस्तार झाला पाहिजे. देशाच्या आर्थिक वाढींत नागर–व्यवसायांच्या वृद्धीला असें फार महत्वाचे स्थान आहे.

साम्यवादी मतप्रणालीचे कांहीं देश सोडले तर बहुतेक देशांत झालेला आजवरचा आर्थिक विकास योजनाबद्ध पद्धतीनें झालेला नाहीं. अिंग्लंड-अमेरिकेंत बहुतेक विकास अर्थ व्यवहार अनिर्बंध असतां व सरकारी विशेष संचालन नसतां घडून आला. जर्मनी-जपानांत नियंत्रण व संचालन जास्त होते. या देशांत शेती सुधारणा, नागरी उद्योगधंद्यांची वाढ, कृषींतील कामकरी कमी करून ते नागरी उद्योगधंद्यांत गुंतविणें उत्पादक साधनसंपत्तीची वाढ हें सर्व क्रमाक्रमानें झाले परंतु येथेंही सर्वांगीण पूर्व योजना नव्हती. तेथील भांडवलवाल्यांनीं सरकारी छत्राखालीं आपलें सामर्थ्य व धंदे वाढविलें त्याचा परिणाम मात्र त्या देशांचे एकंदर उत्पादन व साधन-संपत्ति वाढण्यांत झाला.

आतांच उल्लेखिलेली हीं बहुतेक राष्ट्रें मूलतःच आपल्या राष्ट्रापेक्षां संपन्न होती आणि ज्या काळांत त्यांचा आर्थिक विकास झाला त्या कालांतील एकंदर जागतिक परिस्थितीही त्यांना अनुकूल अशीच होती. आजच्यापेक्षां त्या वेळेस एकंदर विकासाला अधिक वाव होता. आपण आर्थिकदृष्टया गरीब आहोंत. शिवाय एकंदर जागतिक परिस्थितीमुळें आज सहज विकासाला थोडा वाव राहिला आहे आणि आजची समाजव्यवस्थाहि निराळी आहे. आजच्या परिस्थितींत तशाप्रकारें भांडवलवाल्यांच्यामार्फत आर्थिक विकास घडवून आणणें इष्ट नाहीं कारण असें झाल्यास आजच्यापेक्षांही

## पैसेवाल्यांची समाजावर हुकमत चालेल.

त्यांच्यावर हें काम सोपविणें झाल्यास त्यांचे व्यवहार अनिर्बंध ठेवावे लागतील. धनपतीस अधिक श्रीमंत होण्यास वाव द्यावा लागेल. यामुळें सध्यां समाजांत असलेली विषमता अधिक वाढेल. अेकंदर समाजस्वास्थ्यास व शांततेस बाध येण्याचा संभव अधिक निर्माण होईल. आज अेकंदर

विश्वसमाजाच्या मनोभूमिकेंतच फरक पडला आहे. तेव्हां या परिस्थितींत जपान-जर्मनीच्या औद्योगिक विकासाचा मार्ग आपल्याला चोखाळतां येणार नाही.

गरीब अशा या जुन्या देशाचा विकास आर्थिक समता सांभाळून कसा काय करावयाचा हें अेक मोठें कोडें आहे. हें कोडें अिष्टपद्धतीनें सोडविण्यासाठीं आपणांस काय केलें पाहिजे हें पाहूं गेल्यास—सर्वसामान्य शिक्षणप्रसार, यांत्रिक कसब जाणणारे तज्ञ तयार करणें, उद्योगधंद्यांची वाढ, शेतीची सुधारणा, कामगारवर्ग धडधाकट राहील अशी व्यवस्था करणें या सर्व गोष्टी कराव्या लागतील. यासाठीं लागणारा पैसा (१) श्रीमंतांवर कर बसवून गोळा करावा लागेल व (२) उपभोग्य वस्तूंचा वापर कमी करून बचतीचें प्रमाण वाढवावे लागेल. यामुळें होणाऱ्या धनसंचयाचा विनियोग योजनापूर्वक आर्थिक विकासाच्या दृष्टीनें नवउत्पादन व उत्पादनवाढ याकरितां योग्य झाला पाहिजे.

केवळ भांडवलवाल्यांवर उद्योगधंद्यांची वाढ सोंपवून भागणार नाहीं कारण पैसेवाल्यांची दृष्टी त्यांच्याजवळचा पैसा अधिक वाढविण्याकडें असते. राष्ट्रीय हिताच्या दृष्टीनें त्यांचे सर्वच व्यवहार होतील असें नाहीं आणि म्हणून कोणता माल निर्माण करावयाचा, कोणता निर्यात करावयाचा, कोणता आयात करावयाचा, हें सर्व राष्ट्रहिताच्या दृष्टीनें ठरवून द्यावे लागेल. विचारपूर्वक योजना ठरवून त्याप्रमाणें अंमलबजावणी झाली तरच आर्थिक नियोजन सफल होतें आणि हें व्हावयाचें तर केंद्रीय-संचालन व सार्वत्रिक नियमन हीं अत्यावश्यक आहेत.

आपला देश मूलतःच गरीब असल्यामुळें अितकी सर्व पथ्यें पाळूनही धनसंचय एकदम फार मोठा होअील अगर उत्पादनशक्ति त्वरेनें वाढेल असें नाहीं. गरीब व अप्रगत राष्ट्रांच्या विकासाचा विचार करण्याकरितां राष्ट्रसंघानें नेमलेल्या समितीच्या अहवालांतील आंकडेमोड यासंबंधीं बोधप्रद ठरेल. या अहवालांत जगांतील सर्व गरीब व अप्रगत राष्ट्रांतील लोकसंख्या सुमारें १५० कोट दाखविली आहे. या सर्व देशांत आपणास हवा असलेला विकास घडवून आणण्यास वार्षिक ९ ते १० हजार कोटींचें भांडवल खर्चावे लागेल असें दाखविले आहे. या देशांतील यापुढें वाढणारी लोकसंख्या कृषिव्यवसायांत न जातां नागर व्यवसायांत गुंतली जाईल व कृषिउत्पादन जास्त वाढेल एवढ्याकरितां ही रक्कम लागणार आहे. या देशांतील सर्व हातांनीं व सर्व बाजूंनीं होणारी आजची बचत एकत्र केली तर ती अडीच हजार कोटींपेक्षां अधिक होणार नाहीं असाही समीतीनें अंदाज केला आहे. गरीब व अप्रगत देशांचा नियोजित विकास साधण्यास सुमारें सात हजार कोटींची तूट पडणार आहे.हें मोठें थोरले खिंडार कसें भरून निघणार? संपन्न राष्ट्रांकडून मदत घेतल्यास ही तूट सहज भरून येण्यासारखी आहे. अमेरिकेकडून हा पैसा मिळणें शक्य आहे. परंतु असा पैसा अमेरिका किंवा अितर संपन्न राष्ट्रांकडून मिळणें अगर घेणें कितपत व्यवहार्य

आहे हें तज्ञांना सांगतां येणार नाहीं असें समितीनें म्हटलें आहे.

गरीब राष्ट्राचा एकंदर विकास घडवून आणण्यासाठीं त्यास स्वतःच्या कष्टावरच अखेरीस भर द्यावा लागेल असें मला वाटतें. आर्थिक विकासासाठीं कोणत्या पद्धतीनें किती श्रम करावे लागतील; त्याकरितां कोणकोणत्या योजना कराव्या लागतील याचा विचार करावयाचा असतो. हा विचार करून त्याकरितां अनुकूल परिस्थिति निर्माण करावी लागते. हें कार्य राष्ट्राकडील मदतीवर विसंबल्यास फारसें शक्य नसतें. कारण दुसऱ्याच्या मदतीनें आपणास हवा असलेला विकास हवा त्या पद्धतीनुसार करतां येईल असें नाहीं. गेल्या शंभरदीडशें वर्षांत ब्रिटिशांच्या अंमलाखालीं झालेला या देशाचा विकास फार अेकांगी झाला हें उघड आहे. अमेरिका आज आपणास सहाय्य करण्यास तयार असली तर तें कोणत्या आर्थिक धोरणानुसार व हें धोरण आपणास कितपत परवडण्यासारखे आहे याचा विचार झाला पाहिजे.

परकीय राष्ट्रांच्या मदतीनें आर्थिक विकास घडवून आणणें राजकीयदृष्ट्या गौण मार्ग ठरतो. तेव्हां तो पत्करला नाहीं तर शेवटीं आपल्या विकासासाठीं आपणास स्वावलंबनाखेरीज अन्य मार्ग नाहीं, हीच खूणगांठ मनाशीं धरली पाहिजे. ( टाळ्या )

# भारताची पंचवार्षिक योजना

दुसऱ्या दिवशीं म्हणजे गुरुवार दि. १३-९-५१ रोजीं सायंकाळीं भारताच्या पंचवार्षिक योजनेवरील भाषणास प्रारंभ करतांना प्राचार्य धनञ्जयराव गाडगीळ म्हणाले कीं,

कालच्या व्याख्यानांत केलेल्या विवेचनाचें सूत्र धरून आजच्या विषयास प्रारंभ करणें युक्त होईल. गरीब व अप्रगत देशांचा विकास करण्यासाठीं त्या राष्ट्राला योजना आंखून आणि कष्ट व त्याग करून भांडवल जमवून आपला आर्थिक विकास साधण्याखेरीज अन्य मार्ग शिल्लक नाहीं हें सांगितलें. जुन्या काळांत देशाचा आर्थिक विकास केवळ व्यक्तिगत साहसावर विसंबून साधणें कांहीं अंशीं शक्य होते, परंतु आज तें शक्य नाहीं. कोणत्याहि गरीब व अप्रगत देशांच्या विकासासाठीं व्यक्तिगत साहाय्यानें निर्माण होणाऱ्या भांडवलाचा संचय व शिल्लक उद्योगवाढ होईपर्यंत थांबण्यास वेळ नाहीं. आपल्या देशाचा विकास त्वरेनें घडवून आणण्यासाठीं केंद्रसत्तेकडून योजना आंखली गेली व अमलांत आणली तरच तें शक्य आहे. नाहींतर नाहीं.

संयुक्त राष्ट्रसंघानें नुकतीच जी एक समिति बोलाविली होती त्या समितीचेंहि या विषयावर एकमत झाले आहे. या समितीमध्यें

## पुणें ते शिकागोपर्यंत

जगांतील निरनिराळ्या ठिकाणचें अर्थशास्त्रज्ञ एकत्र जमले होते. गरीब व अप्रगत देशांच्या आर्थिक विकासासाठीं मध्यवर्ति सत्तेकडूनच योजनापूर्वक प्रयत्न झाले पाहिजेत आणि तरच ते शक्य होईल. याविषयीं या सर्व तज्ञांचे पूर्ण एकमत झालें. प्रत्येक देशाच्या भिन्न भिन्न परिस्थित्यनुरुप त्या त्या ठिकाणच्या योजनेच्या तपशीलांत फरक पडणें स्वाभाविक असले तरी केंद्रसत्तेकडून हें सर्व आर्थिक नियोजन झाले पाहिजे. ह्या मूळ तत्त्वाबाबत कोणाचेंहि दुमत झाले नाहीं.

याबाबत भारतामध्येंहि फारसा मतभेद नाहीं. कांहीं आग्रही लोक सोडले तर मध्यवर्ति सरकारनें विकास—योजना ठरवून त्याप्रमाणें कार्य घडवून आणावे' असेंच सर्व राजकीय पुढारी व अर्थशास्त्रज्ञ म्हणतात. शिवाय सरकारनें गतवर्षींच एक नियोजनमंडळ नेमलें त्यावरून सरकारी धोरण स्पष्ट आहे. या भारतीय नियोजनमंडळानें कांहीं दिवसांपूर्वीं

## पंचवार्षिक नियोजनाचा एक कच्चा खर्डा

तयार करून प्रसिद्ध केला आहे. या खर्ड्यामधील संकल्पित योजनेचें स्वरूप कसें दिसतें याचेच मी आज विवेचन करणार आहे. या विकास योजनेमध्यें

## भांडवली खर्चाची तरतूद कितपत

केली आहे हें पाहणें हा पहिला विचार आहे. त्या दृष्टीनें पाहूं गेल्यास, भांडवली विनियोगाची योजना दोन भागांत मांडली आहे. पहिला मुख्य विभाग व दुसरा परकी मदत मिळूं लागल्यास पुरवणीवजा आहे. पहिल्या विभागांत १५०० कोटी खर्चाची व दुसऱ्यांत ३०० कोटींची तरतूद केली आहे. ही सर्व सरकारी खर्चाची तरतूद आहे. एकंदर योजनेमध्यें खाजगी भांडवली विनियोगाबाबत अंदाज केला असला तरी निश्चित आंकडे जमेस धरलेले नाहींत. योजनेचें स्वरूप मुख्यत: सरकारी खर्चाबाबत योजना असेंच आहे. वर सांगितलेल्या १५०० कोट रुपयांपैकीं ठोकळ मानानें पाहता साडेचारशें कोटी रुपये पाटबंधारे व तद्जन्य वीजपुरवठा यासाठीं धरले आहेत. चारशें कोटी रुपये रेल्वे सडका वगैरे वाहतुकीच्या मार्गासाठीं धरले आहेत. सुमारें शंभर कोट रुपये औद्योगिक भांडवलासाठीं, दोनशेंकोट रुपये एकंदर शेती सुधारणेचा कार्यक्रम व अडीचशें कोट रुपये समाजसेवा अगर लोककल्याणाच्या खात्यासाठीं आहेत., उरलेले १०० कोट रुपयांचा अनेक किरकोळ बाबीं मिळून विनियोग होणार आहे.

या सर्व योजनेंत उत्पादनवाढीची मुख्य तरतूद पाटबंधारे बांधण्याची आहे. हीच खरी महत्त्वाची योजना आहे. यापासून होणाऱ्या उत्पादनानें राष्ट्रीय संपत्तीमध्यें बरीच भर पडण्याची अपेक्षा आहे. म्हणून ही योजना कोणत्या दृष्टीनें बनविली गेली हे प्रथम पाहिलें पाहिजे. हें साडेचारशें कोटी रुपये कोणत्या तऱ्हेनें कोठें कोठें खर्च व्हावयाचे हें पाहिलें म्हणजे या एकंदर

योजनेचें स्वरूप व सूत्र लक्षांत मेईल.

महाराष्ट्राबद्दल बोलावयाचे तर मुंबईप्रांतांचा जुना मध्यविभाग–त्यांत–काय होणार हें पाहिलें पाहिजे. या मध्यविभागांत योजनेचा कितपत भाग येणार आहे हें पाहिल्यास बुचकळ्यांत पडल्यासारखें होते. कारण या विभागापुरती

**पंचवार्षिक योजना अभावानें स्पष्ट होत आहे.**

काल्वे व पाट कोठें असावेत तर जेथें त्यांची अत्यंत जरुरी आहे तेथेंच. हा अगदीं सरळ आणि स्पष्ट विचार आहे. अगदीं जुन्या काळांत म्हणजे १९०२ सालीं जेव्हां त्यावेळच्या राज्यकर्त्यांनीं नेमलेल्या **पटबंधारा कमिशननें** या प्रश्नाचा विचार केला तेव्हांच असें नमूद करून ठेवले कीं, या भागांत पावसाच्या अभावीं सारखा दुष्काळ पडतो व त्यासाठीं वारंवार पैसा खर्चावा लागतो. म्हणून असे जे निर्जल प्रदेश आहेत ते सजल करण्यासाठीं प्रथम खर्च केला जावा आणि नंतर तो अितरत्र केला जावा. तसेंच पाणी उपलब्ध झाल्यानें जेथील शेतींत विशेष फरक पडून उत्पादनांत मोठा वाढावा होईल त्यास दुसरा क्रम द्यावा. हीं दोन प्रमुख गमकें तेव्हांपासून सांगण्यात आलीं आहेत.

जेव्हां निरनिराळ्या प्रदेशांच्या आर्थिक परिस्थितींत फरक असतो तेव्हां मागें पडलेल्यांना पुढें आणण्यासाठीं प्रथम खर्च करणें हेंही न्यायाचे असते व, त्यासाठीं सरकारी खर्च व्हावा लागतो. जे संपन्न आहेत त्यांनीं गरीबांना मदत प्रथम होऊं द्यावयाची असते जागतिक समतेचें तत्त्व जेव्हां आपण सांगतो तेव्हां स्वदेशांत निदान प्रादेशिक समता निर्माण करण्यासाठीं सरकारी पैसा वापरणें इष्ट व आवश्यक ठरते.

महाराष्ट्र गरीब आहे. येथें दुष्काळ वारंवार पडतो. आर्थिकदृष्टया तो मागासलेला आहे. परंतु येथील जमीन अशी आहे कीं ती सजल केल्यास उत्पन्नाची वाढ झपाट्यानें होण्यासारखी आहे. या सर्व दृष्टीनें पाहतां राष्ट्रीय उत्पादन योजनेंत महाराष्ट्राचा अग्रहक्क आहे. असें असतां **भारताच्या या पंचवार्षिक योजनेमध्यें** मात्र एका **गंगापूरच्या** धरणाखेरीज दुसऱ्या कोणत्याहि ठिकाणचा उल्लेख नाहीं आणि गंगापूरच्या धरणाचा उल्लेखहि अगदीं अगतिक होऊन करावा लागला असें दिसतें. कारण गंगापूर धरणाचें काम सुरू झालेले आहे.

९३ कलमी सरकारच्या कालांत एक महायुद्धोत्तर आर्थिक योजना आंखली होती. **नाईट साहेबाची** योजना म्हणून ती योजना परिचित आहे. त्या योजनेंत (१) **वीर** (२) **खडकवासले** (३) **मुळा** (४) **गिरणा** व (५) **गंगापूर** अशा पांच पाणीपुरवठा योजना महाराष्ट्रांकरितां आंखण्यात आल्या होत्या आणि त्या अत्यंत महत्वाच्या व अग्रहक्काच्या अशा होत्या. आजच्या मंत्रिमंडळानें १९४७ सालीं याबाबत जो एक अहवाल तयार केला त्यांतहि या पांचहि योज-

नांचा समावेश केलेला होता व त्या प्रथम हातीं घेण्याचे मासिद्ध झाले होते. या सर्व योजनांची स्थापत्य दृष्टीनें ४० वर्षांपूर्वी पाहणी झालेली आहे. महाराष्ट्रांतील या योजनांचा विचार अगदींच नवा नाहीं, सर्व कांहीं ठरलेले असतांना व ४४ सालीं आणि ४७ सालीं त्यांचा पुनरुच्चार झालेला असतांहि ५१ सालच्या योजनेंतून मात्र त्या पांच योजनांपैकीं ४ योजना वगळण्यांत आल्या याचें आश्चर्य वाटल्यावांचून राहात नाहीं. गंगापूरचें काम तीन वर्षांपूर्वीच सुरू झाले म्हणून ती वाचली.

डेक्कन ॲग्रिकल्चरल् असोसिएशननें पाटबंधाऱ्यांच्या योजनांमध्यें पूर्वीपासून फार लक्ष घातलें आहे. या मंडळानें या प्रश्नाचा विचार करण्याकारितां एक समिति नेमली होती. कृषि व स्थापत्य खात्यांमध्यें अत्यंत महत्वाच्या जागांवर काम केलेल्या अनुभवी सेवानिवृत तज्ञ अधिकाऱ्यांचा त्यांत समावेश केला होता. अगदीं निरुपद्रवी अशी ती समिति होती..( हंशा ). मी त्यांत होतो. व आपणा सर्वांचे मित्र श्री. हरिभाऊ फाटक हेही त्या समितीवर होते. हंशा )

या समितीनें पूर्ण विचार करून असें ठरविलें होतें कीं, किरकोळ पाटबंधारे व विहिरी यावर प्रथम पैसा खर्च न करतां मोठमोठ्या धरणांच्या वरील योजना हातीं घ्याव्या. या मोठ्या धरणांखेरीज यापुढें महाराष्ट्राचा तरणोपाय नाहीं. या बाबतींत आमच्या या समितीनें मंत्रिमंडळाचीहि भेट घेतली. त्यावेळीं **वीर व खडकवासल्याच्या** योजना पूर्ण करण्यांत भोर संस्थानचे हितसंबंध आड येत असल्याची अडचण त्यांनीं सांगितली. ती अडचण नसती तर आम्ही ह्या योजना आत्तांच हातीं घेतल्या असत्या असेंही त्यावेळीं आम्हाला सांगण्यांत आले. आतां **भोर संस्थान** विलीन होऊन बराच काळ झाला. तेव्हां १९५१ सालच्या योजनेच्या वेळीं सरकारच्या दृष्टीकोनांत फरक झालेला दिसतो असें म्हणणें प्राप्त आहे. याबाबत एवढेंच सांगावयाचें कीं, राष्ट्रविकासाच्या दृष्टीनें पैशाचा विनियोग करतांना तात्कालिक राजकीय विचार लक्षांत घेऊन चालणार नाहीं. सरकारच्या या धोरणामुळें जर

**जनतेचा सरकारवरील विश्वास उडूं लागला तर त्या जनतेला दोष देतां येणार नाहीं. विकासाची खरीखुरी उत्तम संधी डावलून सरकार आज सार्वजनिक पैशाचा दुरुपयोग करीत आहे असा माझा सरकारवर स्पष्ट आरोप आहे.**

महाराष्ट्राखेरीज इतर ठिकाणच्या योजनाबद्दल मी माहितीपूर्वक बोलूं शकत नाहीं. परंतु इतरत्र ही आवश्यक पूर्वतयारीच्या योजना डावलल्या, घिसाडघाईनें नवीन घुसडल्या; अशा प्रकारची कुजबूज ऐकूं येत आहे. महाराष्ट्रांतील योजनाबाबत ही जी गडबड करण्यांत आली त्यावरून इतरत्र ऐकूं येणारी कुजबूज खरी नसावी असें म्हणतां येत नाहीं.

आतां भांडवली विनियोगाच्या योजनांच्या एकदर स्वरूपाच्या विचाराकडे वळूं. याकारितां राष्ट्रीय विनियोगांत अग्रस्थान कशाला द्यावयाचें हें प्रथम विचारपूर्वक ठरविलें पाहिजे. आपल्या

देशांतील बहुसंख्य लोक कृषि व्यवसायी आहेत. कृषिमध्येंच आपला फार मोठा समाज गुंतून राहिला आहे. कृषिसारख्या प्राथमिक उत्पादनांत येवढ्या मोठ्या समाजाची शक्ति गुंतवून न ठेवतां त्यांना तेथून मोकळे करून बहुविध उत्पादनांत त्यांना गुंतविलें पाहिजे. त्यासाठीं औद्योगिक कारखान्याची व इतर नागरव्यवसायांची वाढ झाली पाहिजे. परंतु आपणापुढें आलेल्या **पंच वार्षिक योजनेंत** औद्योगिक विकासाच्या मूलभूत प्रश्नाकडें पूर्ण दुर्लक्ष झालेलें आहे. योजनेप्रमाणें सध्यां चालूं असणाऱ्या कांहीं खाजगी कारखान्यांना सरकार ८० कोट भांडवली खर्च देणार असून त्यांतील कांहीं रक्कम मदत म्हणून व त्यांतील कांहीं कर्ज रूपानें देण्यांत येणार आहे.

खाजगी उद्योगपतींच्या खर्चाचा अंदाज आहे तो असा :— यांना जुनी सामुग्री ठाकठीक करण्यास १५० कोटी खर्च लागेल व शेंसव्वाशे कोटींची नवी सामुग्री आणण्यांत येईल. दुरुस्ती व नवकाराचा खर्च सोडल्यास दोनशें कोटीपेक्षां अधिक पैसा औद्योगिक विकासास सरकार व खाजगी व्यवसाय या दोहों मिळून मिळणार नाहीं. अशी ही योजना आहे.

यंत्रनिष्पत्ति, विद्युत् निर्माण करण्याची साधनें व ज्यामुळें उद्योगधंद्याची वाढ झपाट्यानें होऊं शकते अशी मूलभूत साधनें उत्पादन करणें ही औद्योगिक विकासाची पहिली पायरी आहे. याविषयीं तज्ज्ञांची एकवाक्यता आहे. परंतु अशा रीतीनें औद्योगिक प्रगतीचीं पावलें पुढें पड-तील असें घडविण्याची या योजनेंत कांहीं तरतूद नाहीं.

औद्योगिक विकासासाठीं मूलभूत उत्पादन साधनांची वाढ करण्यासारखीं जपानमध्यें अनु-कूल परिस्थिति नसतांनाही त्यांनीं ते आटोकाट प्रयत्न करून साध्य केलें आहे. परंतु मूलभूत उत्पादन साधनांची वाढ करण्याखारखी अनुकुल परिस्थिति भारतांत असतांहि या योजनेंत त्याकडें फारसें लक्ष पुरविलेले नाहीं. यावरून

**पंचवार्षिक योजनेचा विकास योजना म्हणून विचार झाला आहे किंवा नाहीं याची मला शंका येते.** ( हंशा )

विकासयोजना म्हणजे क्रमाक्रमानें आर्थिक प्रगति कशी होणार, पुढें कोठपर्यंत कसे जाणार. प्रथम गोष्टी कोणत्या केल्या पाहिजेत, पुढें कोणत्या होणार याचा विचार करून या सर्वांस जुळेल अशी मांडणी करणें व त्याला अनुसरून प्रथमावस्था ठरविणें याला मी विकास योजना म्हणतो. तसें येथें झालें आहे असें दिसत नाहीं. योजनेनंतरच्या पुढच्या पांच वर्षांत काय होणार आहे याचा या योजनेशीं कांहीं विचार दिसत नाहीं.

आपल्या राष्ट्रांत पूर्णोद्योगावस्था निर्माण करणें हें त्या त्या राष्ट्रांतील सरकारचें मुख्य काम आहे. हेंही पण आतां सर्वमान्य आहे. परंतु तशी कांहीं व्यवस्था करण्याचा आरंभ तरी या योजनेंत आहे कां हे पाहूं गेल्यास निराशाच होते. कृषिव्यवसायांत आपल्या देशांत जेथें

तेथें अल्पोद्योग आढळतो. बहुसंख्य शेतकऱ्यांस या देशांत भरपूर काम नाहीं. पुष्कळशा शेतकऱ्यांना वर्षांतील बरेच दिवस निरुद्योगी राहावे लागते. शेतकऱ्यांना पुरतें काम मिळेल किंवा काम-नसलेल्यांना इतरत्र उद्योगक्षेत्र मिळेल किंवा तसें तें मिळण्याचा संभव निर्माण होईल याचा या योजनेंत कोठेंहि उल्लेख नाहीं.

कृषींतील ही अल्पोद्योगावस्था थांबविणें असेल तर त्यांतील कांहीं लोक इतर उद्योगधंद्यांत गुंतविले पाहिजेत. निदान आतां आहे तेवढेंच राहतील; याहून वाढणार नाहींत अशी व्यवस्था केली पाहिजे. यापुढील वाढणारी लोकसंख्या शेतीत न जातां इतरत्र गुंतेल अशी योजना झाली पाहिजे.

दर दहा वर्षांस भारतामध्यें वाढणाऱ्या लोकसंख्येचें प्रमाण व एकंदर कामकऱ्यांचें लोकसंख्येंतील प्रमाण लक्षांत घेतां येत्या पांच वर्षांत ७० लक्ष लोक नवीन कामकरी तयार होण्याचा संभव आहे. या ७० लक्ष नवीन कामकऱ्यांना शेतीव्यतिरिक्त दुसरें कोणतें तरी काम देणें हा महत्वाचा विचार ठरतो. असें काम द्यावयाचें तर दर व्यक्तीमागें कांहीं तरी भांडवलाचा विनियोग होण्याची व्यवस्था झाली पाहिजे. दर कामकऱ्यामागें रु. २००० किमान धरले तर १४०० कोट रुपये भांडवलाचा विनियोग बिगरशेतकी व्यवसायांत करावा लागेल. हा आंकडा जरी आज आपणांस आवाक्याबाहेरचा वाटला तरी विकास योजना आंखतांना आपणास त्या दृष्टीनें पावलें टाकावयाची आहेत हें लक्षांत घेऊन योजनेंत त्यासंबंधीं कांहीं तरी तरतूद करणें जरूर आहे.

पुढील वृत्ति-व्यवस्था किंवा व्यवसाय-रचना-प्रमाण हें **विकासयोजनेचें मर्म असल्याचें ही योजना आंखणारांना समजलें नाहीं किंवा विकासयोजना म्हणून आंखली गेलेली नाहीं** असें म्हणावें लागते. हें असें कां झाले असावे याचा विचार करतां असें दिसतें कीं १९४८ सालीं मध्यवर्ति सरकारनें जाहीर केलेले औद्योगिक धोरण हें या सर्व गोंधळाचें उगमस्थान आहे.

उद्योगधंद्याचें राष्ट्रीयकरण करणें जरूर आहे. पण ते येत्या दहा वर्षांत करणार नाहीं ही जी घोषणा सरकारनें केली त्यामुळें उद्योगपति निश्चिंत झाले व सरकारचे हात बांधले गेले. उद्योगपती व भांडवलदार वर्गाला गोंजारण्याच्या धोरणामुळें आज जी ही विकासयोजना आंखली गेली यापेक्षां निराळ्या पद्धतीनें ती आंखली जाणें शक्यच नव्हते.

उत्पादनक्षेत्रांत समाजाचें नियमन असल्याखेरीज त्यांत कांहीं एक योजनाबद्ध प्रगति होऊं शकत नाही. परंतु १९४८ सालीं करण्यांत आलेल्या यासंबंधीच्या सरकारी घोषणेमुळें

**भारताच्या आर्थिक धोरणाचे दोन तुकडे झाले.**

ज्या क्षेत्रांत मोठा आर्थिक लाभ होण्याचा संभव असतो अशीं सर्व व्यवसायक्षेत्रें खाजगी व्यक्तीकडे ठेवण्यांत आली व जेथें खर्च अधिक व लाभ कमी ती क्षेत्रें समाजाच्या काबूंत करण्यांत

आली. मोठमोठे कारखाने, बँका, घाऊक अंतर्गत व परकी व्यापारउदीम हीं सर्व विशेष अर्थोत्पादक क्षेत्रें खाजगी व्यक्तींच्या हातीं ठेवून त्यांना निदान दहा वर्षे निश्चित करण्यांत आलें. या सर्व क्षेत्रांतील प्रगति व्यक्तिसाहसावर अवलंबून होऊं द्यावयाची असें धोरण ठरल्यावर उद्योगपतींचा व्यवहार त्यांच्या व्यक्तिगत फायद्यानुसार होणार असल्यामुळें श्रीमंतांवर जास्त कर लादून चालणार नाहीं हाहि विचार ओघानें आला. तेव्हां प्रत्यक्ष कराच्या मार्गानें भांडवलाकरितां पैसा गोळा होण्याचा मार्ग बंद झाला आहे. अशाप्रकारें १९४८ च्या अर्थविषयक धोरणाच्या घोषणेमुळें भारताची अर्थविकासाबाबत पुच्छप्रगतीच सुरू झाली आहे. (हंशा) याचें विशेष प्रत्यंतर जर कोठें येत असेल तर तें पंचवार्षिक योजनेंतील औद्योगिक विभागामध्यें या विभागांतील योजनासूचनांचें स्वरूप आर्थिक योजनेचें नसून उद्योगपतींशीं त्यांच्या उद्योगधंद्याबाबत झालेल्या चर्चेचा वृत्तांत असें आहे (हंशा)

१९४७-४८ सालीं लियाकत अल्लीखानांनीं केलेल्या अंदाजपत्रकामुळें देशाची आर्थिक घडी बिघडली असा गवगवा उद्योगपतींनीं त्यावेळीं केला व त्यानंतरचे अर्थमंत्री उद्योगपतींना एकसारखे सुटी व सवलती देत गेले. अशारीतीनें आतांपर्यंत दरवर्षी २९ ते ३० कोट रुपयांची सूट भारतांतील धनपतींना दिली गेली असावी. इतक्या सुटी व सवलती दिल्यानंतर व्यक्तिगत साहसानें वाढलेल्या धनसंचयाचा फायदा देशाचें आर्थिक सामर्थ्य वाढण्याकडे केला जाईल ही जी अपेक्षा होती ती मात्र परिपूर्ण झाली नाहीं. गेल्या तीन वर्षात प्रतिवर्षी १५ कोटींपेक्षां अधिक भांडवल या धनपतींकडून मोठ्या उद्योग धंद्यांत गुंतले गेलें नाहीं असें नियोजनमंडळच म्हणतें. तेव्हां सूट दिल्यामुळें भांडवल वाढेल ही जी अपेक्षा होती ती फोल ठरली आहे. धनपतींकडून असा विपरांत अनुभव आला असतांही अद्यापि आपले सरकार उत्पादनवाढीची सर्व क्षेत्रें खाजगी व्यवस्थेखालीं चालू ठेवीत आहे याचें आश्चर्य वाटतें.

जहाजें बांधण्यासारखा अत्यंत महत्त्वाचा धंदा वास्तविक राष्ट्राच्या मालकीचा असणें जरूर पण भारतांत हा धंदा खाजगी भांडवलदारांच्या हातीं ठेवण्यांत आला आहे येवढेंच नव्हे तर सरकार त्या खाजगी कारखान्यांना पुष्ट होण्यास आणखी मदतही करणार आहे. यावरून हा सर्व कारभार किती उलटा चालला आहे हें दिसून येईल. हें असेंच चालणार असेल तर देशाच्या आर्थिक विकासाबाबत आपणाला कांहीं एक करतां येणार नाहीं असें वाटते. या सर्व गोष्टींबाबत एकच समर्थन म्हणून सांगण्यांत येतें, तें असेंही मोठमोठें धंदे चालविण्यास सरकार समर्थ नाहीं. पण इतर सरकारी धोरण पाहिलें असतां, सरकारच्या सामर्थ्याच्या कल्पना निराळ्या वाटतात. त्यांतल्या त्यांत आमच्या मुंबईराज्य सरकारनें तर "दोन अचाट योजना हातीं घेऊन दाखविल्या आहेत. रस्त्यांतील मोटार वाहतुकीचें राष्ट्रीयीकरण ही एक अत्यंत अवघड बाब समजली जाते इतर

एकंदर महत्त्वाच्या धंद्याचें राष्ट्रीयीकरण झाल्यानंतर शेवटीं शेवटीं मोटर वाहतुकीचें राष्ट्रीयकरण करणें योग्य मानतात. हे आमच्या मुंबई सरकारनें प्रथमच हातीं घेतलें आहे व त्यांचें मतें यशस्वीही करून दाखविलें.

अमेरिकेसारख्या संपन्न राष्ट्राचें राज्ययंत्र ज्या दारूबंदीमुळें कोलमडून पडण्याची वेळ आली त्या

**दारूबंदीची प्रचार योजनाही**

मुंबई सरकारनें हातीं घेतली आहे. (हंशा व टाळ्या). आणि देशाची खरी साधनसंपत्ति वाढविण्याचीं केंद्रस्थानें आहेत असें लोखंड, पोलाद, सिमेंटसारखे धंदे मोठ्या प्रमाणावरील अल्पसंख्य कारखान्यांत चालणारे धंदे आपणांस चालवितां येत नाहींत या सबबीवर खाजगी मालकांच्या हातीं ठेवले आहेत.। हें सर्व आमच्या राज्यकर्त्यांस कळत नाहीं असें तरी कसें म्हणावें. (हंशा) पण मुद्दाम करतात म्हणावें तर तेंहि कठीण वाटेल.

आपल्या देशांतील प्रमुख मालाची निर्यात सरकारनें आपल्या हातीं ठेवल्यास सरकारला फार मोठा फायदा होण्याचा संभव आहे. अनेक गरीब राष्ट्रांनीं हा उपक्रम केला आहे. कानडानें सुद्धां हा प्रयोग केलेला आहे. गव्हाची निर्यात करणारें बोर्ड निर्माण करून परदेशी गव्हास आलेल्या वाढत्या किंमतीचा परिणाम अंतर्गत किंमतीवर होऊं न देतां झालेला फायदा कृषिसुधारणेकडें खर्च केला. परंतु याबाबतींत आमच्या सरकारचें धोरण उलटेंच आहे. येवढेंच नव्हे तर कांहीं सरकारी बोर्ड व समित्या यानीं शिफारस केली असतांहि गळिताची धान्यें आणि ज्यूट (पाट) यांची निर्यात स्वतःच्या हातीं घेतली नाहीं. या दोन पदार्थांच्या निर्यातीमधील नफ्याच्या कुशीमधून आपल्या देशांतच नव्हे तर इतर देशांतहि अनेक व्यापारी फार संपन्न झाल्याची वदंता आहे. परंतु आपल्या सरकारनें गळीतांचीं धान्यें व पाट यांच्या निर्यात व्यवहाराचें राष्ट्रीयीकरण प्रथम करण्यांत यावें असें सांगितलें असतांहि या नाहीं त्या सबबीखालीं हे दोन्ही व्यवहार त्यांनीं खाजगी व्यक्तींच्या हातीं ठेवले आणि देशाचें फार मोठें आर्थिक नुकसान केले आहे.

नियोजनमंडळाच्या सल्लागार समितीपुढें हा प्रश्न चर्चेसाठीं निघाला असतां निर्यातव्यवहारांचें राष्ट्रीयीकरण करण्याची शक्यता आहे असा उल्लेख योजनेंत केला असल्याचें सांगण्यांत आले. (हंशा) पण खरें पाहिलें तर याबाबतहि योजनेंत निश्चित कांहीं नाहीं. नुसते उल्लेख अनेक आहेत.

(काल सांगितल्याप्रमाणें) गरीब देशाच्या विकासयोजनेंतील खरी अडचण त्या योजनेबाबत भांडवली विनियोग किती करतां येईल यासंबंधींचीच असते. त्यासाठीं जेथें जेथें धनसंचय होण्याची शक्यता अधिक तीं सर्व स्थानें सरकारनें आग्रहपूर्वक आपल्या हातीं ठेवण्याचें धोरण

स्वीकारलें तरच त्या विकासयोजनेस बळकटी येण्याचा संभव आहे. या दृष्टीनेंही मोठ्या औद्योगिक व व्यापाराचीं क्षेत्रें महत्वाचीं ठरतात.

पाटबंधारे बांधणें इत्यादि भांडवली विनियोगाच्या योजना आवश्यक असल्या तरी प्रथम उत्पादक योजना कोणत्या हातीं घेणें जरूर आहे याचा विचार एकंदर विकासक्रमाच्या दृष्टीनें करावा लागतो. केवळ कृषिउत्पादनावर भर देणें म्हणजे बहुविध अर्थव्यवस्था निर्माण करण्याच्या मूलभूत गरजेकडे दुर्लक्ष करणें आहे. हें पाहिलें म्हणजे ब्रिटिश सरकारच्या काळांतील योजना व आजच्या आमच्या स्वतंत्र सरकारची ही योजना यांच्यांत बरेंच साम्य दिसूं लागते ( हंशा )

आम्हीं कांहींतरी करीत आहोंत, खाजगी प्रयत्नानें कांहीं होईल व एकंदर मिळून आणखी कांहींतरी होईल असा बराच अनमानधपक्याचा व्यवहार योजनेंत आहे. यांत नक्की तपशील असा थोडा आहे आणि तपशीलाच्या अभावी ही योजना कची राहिलेली आहे. ही योजना म्हणजे बरेच ठिकाणीं "अधिक धान्य पिकवा" मोहिमेसारखी आंकडेमोड व त्या आंकडेमोडीचा अहवाल आहे. नक्की काय होईल हें ज्यावरून समजत नाहीं व तें घडवून आणण्याची जींत तरतूद नाहीं तिला योजना म्हणतां येणार नाहीं.

आतांपर्यंत टीकात्मक बरेंच झालें. तेव्हां एक चांगला विचार योजनेंत आहे तो सांगितला पाहिजे. एका दृष्टीनें पाहिले तर सरकारी धोरणाबाबत या योजनेमुळें एक पाऊल पुढें पडलें आहे. **सर्व प्रकारच्या किंमतीवर नियंत्रण पाहिजे व त्यांचा परस्परांशीं संबंध पाहिजे हें धोरण योजनेंत स्पष्ट मान्य केले गेले हें महत्त्वाचें आहे.**

परंतु किंमतीवर नियंत्रणामुळें प्रत्यक्ष उत्पादनक्षेत्रांत अनेक निरनिराळ्या प्रकारचे फरक होतात हें लक्षांत ठेविले पाहिजे आणि म्हणून किंमती–नियंत्रणाखेरीज प्रत्यक्ष उत्पादन–नियंत्रण हवें. त्यासंबंधींची योजनापूर्ण तरतूद झाली तरच त्या नियोजित नियंत्रणाचा फायदा मिळतो.

आजच्या स्थितींत अन्नधान्यें; गळीताचीं धान्यें व कापूस इत्यादींच्या किंमतीचें प्रमाण फार महत्वाचें आहे. या किंमतीबाबत महत्वाचा प्रश्न म्हणजे अन्नधान्यांच्या किंमती वाढविणार किंवा कापूस, भुईमुगाच्या कमी करणार ! यापैकीं कांहींतरी एक छातीठोकपणें जाहीर करण्याची आवश्यता आहे. परंतु सरकार तसें करीत नाहीं. याबाबत निश्चित धोरण जाहीर करून तें तडीस नेण्याचें धैर्य आजच्या सरकारांत असल्याखेरीज किंमतीचें नियंत्रणहि यशस्वी होणार नाहीं. पण वर, दर्शविल्याप्रमाणें किंमतीशिवाय उत्पादनाच्या तपशीलांत लक्ष घालून प्रत्यक्ष उत्पादनाचें नियंत्रण ठेवलें तरच योजना पार पडूं शकते. नाहींतर एका पैच्या फायद्याचा फरक झाला तर लगेच मांजरपाटाऐवजीं मच्छरदाणीचें कापड कसें निघतें याचा अनुभव आला आहे ( हंशा ) व असे तात्कालिक फरकाचे परिणाम निवारणें नुसत्या भावनियंत्रणानें शक्य नाहीं.

औद्योगिक उत्पादनाचें वाढीबाबत सध्यां भारतांत आहे या यंत्रसामुग्रीचा पूर्ण उपयोग करून घेतला तरी हें उत्पादन वाढेल अशी अपेक्षा नियोजनमंडळानें केली आहे. परंतु येथील उद्योगपती आहे त्या यंत्रसामुग्रीचा पूर्ण वापर करीत नसले तर त्यांना तसें करण्यासाठीं नुसतें किंमती वाढवून देण्याचें आमिष दाखवून भागेल काय ? व जादा किंमतीचें आमिष दाखवून किती दिवस कारभार चालूं शकेल ?

उद्योग धंद्याच्या उत्पादनावर नियंत्रण ठेवण्यासंबंधीचें एक बिल कित्येक वर्षांपूर्वी सरकारनें तयार केलें पण तें सिलेक्ट कमिटींत बहुतेक खच्ची झालें.वास्तविकरीत्या याबाबतींत कडक नियंत्रण असण्याची जरूरी आहे. बिलाच्या हल्लींच्या योजनेंत जर हल्लींपेक्षां उत्पादन पुष्कळ कमी झालें किंवा त्याची प्रत फार उतरली तरच उत्पादनाची पाहणी एका तीन माणसांच्या बोर्डानें करून कांहीं उपाययोजनेबाबत सरकारकडें शिफारस करावयाची. असल्या प्रकारच्या कायद्यांनीं उत्पादनसामुग्रीचा पुरेपूर उपयोग अगर राष्ट्रास हवें तशा प्रकारचें उत्पादन हीं साधणें शक्य नाहीं. यापुढील महत्वाचा प्रश्न योजनेच्या सामाजिक परिणामांचा. कांहीं थोडी तरी आर्थिक समता आल्याखेरीज लोकांना योजनेबद्दल उत्साह वाटूं शकणार नाहीं.)

पण हल्लीची आपल्या समाजाची प्रकृतीच अशी आहे कीं, संपत्तीचीं नवीन साधनें निर्माण होतांच त्याची मालकी कांहीं थोड्याफार लोकांच्या हातीं जाते. आपल्या महाराष्ट्रांतील कालवेपाटांचा फायदा तेथील साखर-कारखानदारांना जितका झाला तितका तेथें दुसऱ्या कोणासही झालेला नाहीं. हजारों एकर जमीन भिजते व त्या सर्व शेतीची मळई कारखानदार घेतात. मूळच्या शेतकऱ्यांना फार थोडा फायदा मिळतो. कांहीं शेतकरीहि आपल्या स्वतःच्या गुणानें व कष्टानें पुढारले आहेत. परंतु त्यांचीहि वृत्ती इतर शेतकऱ्यांना पुढें आणण्याऐवजीं आपणच अधिक मोठें व्हावें अशी आहे. हा या आपल्या समाजाचा प्रकृतिधर्म आहे. हा स्वभाव आमच्या लोकशाही सरकारच्या मंत्र्यांच्या अंगींहि किती मुरलीं आहे याचें परवांच एक प्रत्यंतर आलें.

कोपरगांवच्या कांहीं शेतकऱ्यांनीं तेथील पाटाच्या पाण्याची फेरवांटणी आतां १९५२ मध्यें होणार आहे तेव्हां लहान शेतकऱ्यांस पाणी देण्याबाबत विशेष धोरण स्वीकारावें अशी मागणी केली. तेव्हां आज तुम्ही जुन्या लोकांच्या पाण्यांत वाटणी मागतां

**उद्यां तुम्ही लोकांच्या घरांचीहि वांटणी मागाल.**

असें या लोकनियुक्त मंत्र्यांनीं उत्तर दिलें. यावरून हल्लींचे मंत्री सार्वजनिक कालव्यांच्या पाण्याच्या वांटणीचा प्रश्न कोणत्या दृष्टीनें हाताळतात व संपत्तीची वांटणी आतां आहे तशीच ती पुढेंहि राहावी ही कल्पना त्यांच्या मनांत किती घट्ट बसली आहे याचें प्रत्यंतर येते.

सत्तेचें आणि संपत्तीचें केंद्रीकरण हल्लीं होत आहे व या प्रवृत्तिविरुद्ध या योजनेंत कांहींहि

नाहीं. म्हणजे ही योजना अनिष्ट प्रकारच्या केंद्रीकरणास अपरोक्ष सहाय्यच करीत आहे असें म्हणावें लागते. कारण नवीन भांडवली विनियोग होत असतां संपत्तीचें हें केंद्रीकरण असेंच चालू राहाणार असेल तर या योजनांचा फायदा मुख्यत: श्रीमंतासच मिळणार हें उघड आहे. या योजनेंतील भांडवली खर्चाच्या तरतुदीच्या पद्धतीमुळें किंमती पुन्हां वाढू लागण्याचा संभव आहे. असें झाल्यास अधिक समानता जास्त येण्याऐवजीं विषमताच वाढण्याचा संभव आहे.

संपत्तीची समान वांटणी व्हावी याकारितां या योजनेमध्यें प्रत्यक्ष कोणतीच तरतूद केलेली नाहीं. उलट इंग्लंडमध्यें अनेक मार्गांनीं हे समानतेचे प्रयत्न होत आहेत. श्रीमंतावर कर वाढवून उपभोग्य वस्तूंच्या वापरावरील नियंत्रणें वाढवून शक्यतों राहणीचें मान वर्गावर्गांत समान ठेवण्याचें त्यांचे आटोकाट प्रयत्न चालू आहेत. माझ्या नुकत्याच झालेल्या प्रवासांत मी तीन विमानतळ पाहिले तेव्हां हा फरक माझ्या फार प्रकर्षत्वानें नजरेंत भरला. अत्यंत वैभवशाली अशा अमेरिकेच्या न्यूयॉर्क येथील विमानतळावर कोऱ्या करकरीत मोठमोठ्या मोटारगाड्यांची रीघ लागली होती. तेथून लंडन विमानतळावर उतरलो तेव्हां तेथें आपल्या लहान लहान व बहुधा जुन्याच मोटारी दिसल्या आणि त्यानंतर मी मुंबईच्या विमानतळावर उतरलो तेंव्हां पुन्हां न्यूयॉर्कच्या विमानतळाप्रमाणेंच कोऱ्या मोटारींचा झगझगाट दिसला. यामुळें आमच्या सरकारचें धोरण स्पष्ट होत आहे.

समानता मुद्दाम आणण्याचे प्रयत्न तर राहोच पण योजनेंतील ज्यामुळें आणखी विषमत वाढेल त्यांचे हे परिणाम टाळण्याची जागरूकताही दाखविण्यांत आली नाहीं. लोखंड पोलादाच्या आणि नौका बांधण्याच्या खाजगी कारखानदारांना मदत करून आज त्यांना सुस्थिति येईल. खाजगी प्राप्ति वाढेल. मग हीच गोष्ट उद्याच्या सरकारास जाचक ठरेल. आज डबघाईस आलेले कारखाने कमी किंमतींत घेऊन राष्ट्राच्या मालकीचे होण्यासारखें असतांना उद्याच्या सरकारास त्यांचें राष्ट्रीयकरण करतांना ते महाग करून ठेवण्याचे महत्कार्य आजचे सरकार त्यांना आर्थिक साहाय्य देऊन करीत आहे. या कारखान्याचें बरें होऊं नये असें मला वाटते असा याचा अर्थ नाहीं. परंतु सरकारच्या दृष्टीनें त्यांचा हा व्यवहार गैरहिशेबी होत आहे असें म्हटल्यावांचून राहावत नाहीं. आजचे सरकार याबाबत आपल्या कर्तव्यास जागत नाहीं असें म्हणावें लागते.

राष्ट्रीय विकासयोजनेमध्यें समाजसेवेसंबंधींची लोककल्याणाची योजना म्हणून एक भाग असतो. इतर सर्व देशांत, बेकारांना वेतन, त्यांची व गरीबांची मोफत औषधयोजना, म्हातारपणींचें वेतन, कर्जनिवारण वगैरे ज्यायोगें समाजस्वास्थ्य निर्माण होईल असे प्रयत्न करण्यासाठीं खर्च करावा लागतो. आमच्या या विकासयोजनेंत या कार्याचा पुसट उल्लेखही करण्यांत आलेला नाहीं.

सारांश, या योजनेकडें पाहिलें असतां ही राष्ट्रविकासाची योजना नसून ती एक ठाकठीक **बांधकामाची यादी आहे.**

( हंशा व टाळ्या ) असें म्हणावे लागते. ग्रामोद्योगामुळें अनेक लोकांना काम मिळेल असें यांत नुसते सांगितले आहे. परंतु त्यासंबंधीं कोणतीहि प्रत्यक्ष योजना नाहीं. खरोखर ग्रामोद्योगांत फारशी नवीन माणसें गुंतण्यास आपल्याकडें वाव नाहीं. कृषिव्यवसाय व कृषिउत्पादनाचें रूपांतर याविषयीं कोठेंच कांहीं सांगितले नाहीं. केवळ ग्रामोद्योगाचा उच्चार केल्यानें ग्रामोद्योग चालू होत नाहींत. त्याकरितां अनेकांनीं उपाययोजना करावी लागली. त्याचा कोठेंच तपशीलवार अगर सूक्ष्म विचार योजनेंत नाहीं.

योजना म्हटली म्हणजे पुढील काळांत येणाऱ्या संभाव्य घटनांचा विचार करून चपखल बसतील असें परस्परांशीं संबध असलेले आडाखे बांधावें लागतात. तसें यांत कोठेंच कांहीं नाहीं. या बांधकामाच्या यादींत एक चांगले आहे. यांत प्रत्यक्ष असें कांहीं सरकारी खर्चाचे आकडे आहेत. ते सर्व व्यवहार्य वाटतात. हा मागील तीनचार वर्षांपेक्षां एक विशेष फरक वाटतो. यापेक्षां जुन्या जमान्यांतून आपण नव्या जमान्यांत आलो असें वाटण्यासारखे कांहींएक नाहीं. फारतर चांगल्या ब्रिटिश राजवटींत नांदत आहोत इतपत समाधान मानायला हरकत नाहीं. ( हंशा ) परंतु नव विचारास प्राधान्य मिळेल, लोकांना नवीन हुरूप येईल व नवयुगाशीं आपला संबंध येण्यास सुरुवात होईल असें वाटण्याइतपत विचार या विकासयोजनेंत नाहीं. ( टाळ्या )

आभारप्रदर्शनानंतर या दोन व्याख्यानांचा कार्यक्रम पूर्ण झाला.

——०×०——

# डेक्कन ॲग्रिकल्चरल ॲसोसिएशन पुणें.

## या संस्थेची प्रकाशनें

1. The food Problem and The Reconstruction Programme of Bombay Province — 1937

१. अन्नधान्याचा प्रश्न व मुंबई प्रांतांची पुर्नघटना योजना. — १९४७

२. डेक्कन ॲग्रिकल्चरल ॲसोसिएशन, पुणें.
चाळीस वर्षांच्या कार्याचा त्रोटक वृत्तांत सन १९०९ ते १९४९ अखेर — १९४९

3. A Note on the structure of Agricultural Education. — 1950

4. Memorandum Submitted to the Grow more food policey Committee.
Bombay state. — 1951

४. अधिक धान्य पिकवा-धोरण समितीला सादर केलेले निवेदन — १९५१

५. प्राचार्य धनंजयराव गाडगीळ यांची दोन व्याख्यानें — १९५१

६. शेती शिक्षण [ छापत आहे. ] — १९५१

७. भारताच्या पंचवार्षिक योजनेबाबत डेक्कन ॲग्रिकल्चरल ॲसोसिएशनचे निवेदन. — १९५१

मुद्रक :—व. वि. आपटे, B. Com. हिंदुस्थान मुद्रणालय, ८६५ सदाशिव पेठ, पुणें २.
प्रकाशक :—डॉ. एन्. व्ही. कानिटकर, M. Ag. D. Sc. डेक्कन ॲग्रिकल्चरल असोसिएशन, गोखले, हॉल पुणें